Chembur Sarvankash Shikshanshastra Mahavidyalaya Chembur Mumbai 400 071.

Chembur Education Society's

**Chembur Sarvankash Shikshanshastra Mahavidyalaya,**

R. C. Marg, Chembur, Mumbai 400071

**SSR Criterion 6: Governance Leadership & Management**

6.5: Internal Quality Assurance System

***6.5.3.1 Annual Report of the Institution indicating Quality Initiative by IQAC***

***(2018-19 to 2022-23)***

Principal

Principal
Chembur Sarvankash Shikshanshastra
Mahavidyalaya
R.C. Marg, Chembur, Mumbai - 400 071.

Chembur Sarvankash Shikshanshastra Mahavidyalaya Mumbai 400 071.

# चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय

## ❖ वार्षिक अहवाल २०१८-१९ ❖

चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचा २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाचा संक्षिप्त अहवाल आपणासमोर सादर करीत आहोत.

यशस्वीरीत्या वाटचाल करीत चेंबूर सर्वंकष शिक्षणाशास्त्र महाविद्यालयाने आता ४८ व्या वर्षात पदार्पण केले आहे. एन.सी.टी.ई. च्या २०१४ च्या नियमानुसार आता बी.एड. कोर्स हा दोन वर्षांचा होऊन या कोर्सचे हे तिसरे वर्ष आहे. लेखी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षा यांचे प्रमाण ६०:४० असून आंतरवासिता कार्यक्रम एकूण अठरा आठवड्याचा झाला आहे. आजच्या बदलत्या परिस्थितीमध्ये मराठी माध्यमात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जरी कमी होत असली तरी आपल्या महाविद्यालयात पूर्ण ५० विद्यार्थी प्रवेशित आहेत. समोर येणारी आव्हाने स्वीकारत महाविद्यालय खंबीरपणे प्रगतिपथावर वाटचाल करीत आहे.

### अ) विविध अभ्यासक्रमा संदर्भात :-

आपल्या महाविद्यालयातील भावी शिक्षकांच्या व्यक्तिमत्वाचा अष्टपैलू विकास व्हावा, यासाठी विविध् विषयांवर आधारित कार्यक्रमांचे आयोजन या वर्षी करण्यात आले.

१. श्री. मानव याज्ञिक यांचा "भगिनी निवेदिता" यांच्या १५० व्या जयंती निमित्त २८ जुलै २०१८ रोजी रामकृष्ण मिशन, खार येथे कार्यक्रम झाला. सदर कार्यक्रमाप्रसंगी आपल्या महाविद्यालयातील दोन भावी शिक्षकांनी (कुमारी गायत्री मोहन व कुमारी श्रृती उदारी) गटचर्चेत सहभाग घेतला होता.

२. श्रीमती महालक्ष्मी आनंद यांनी "learning environment" या विषयावर ११ ऑगस्ट, २०१८ रोजी कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेत त्यांनी अध्ययन पोषकं वातावरण निर्मितीवर भर दिला.

३. श्रीमती महालक्ष्मी आनंद यांनी "वर्ग व्यवस्थापन" या विषयावर १८ ऑगस्ट २०१८ रोजी कार्यशाळा घेतली. यावेळी त्यांनी भावी शिक्षकांना विविध बुध्दिमत्ता असलेले व विविध सांस्कृतिक स्तरातून आलेल्या विद्यार्थ्यांचा वर्ग उत्तमप्रकारे हाताळण्यासाठी विविध कार्यानीति सांगितल्या.

४. सामाजिक बांधिलकी लक्षात घेऊन भावी शिक्षकांच्या मनात सामाजिक कार्याविषयी जाणीव निर्माण व्हावी म्हणून सर्व प्राध्यापक वृंद व विद्यार्थी यांनी नासिओ येथे ३ व ४ डिसेंबर, २०१८ या दोन दिवशी समुदाय कार्य केले. तसेच ५ एप्रिल, २०१९ रोजी "मातोश्री वृध्दाश्रम", खडवली येथे समुदाय कार्य केले.

५. विद्यार्थ्यांना त्यांच्या अंगी असलेले सुप्त गुण सादर करण्याची संधी "प्रज्ञा शोध" या कार्यक्रमाद्वारे दिली जाते. हा कार्यक्रम ८ डिसेंबर, २०१८ या दिवशी घेण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी कविता वाचन, नाट्यछटा, चित्रकला, संगीत, पाककला, नृत्य, विणकाम इत्यादी सादर केले.

६. दिनानंक ७ व ८ जानेवारी, २०१९ रोजी महाविद्यालयात वेध महोत्सवाचे आयोजन केले होते. यात विविध स्पर्धा घेतल्या गेल्या.

७. दिनांक २ मार्च, २०१९ मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. सदर प्रसंगी भावी शिक्षकांनी मराठी भाषेच्या प्रसारासाठी कार्यक्रम सादर करीत असताना मराठी भाषेचे महत्त्व विविध उदाहरणांद्वारे समजावून सांगितले, तसेच स्वरचित कविता सादर केल्या.

८. महाविद्यालयात विविध धर्मांचे प्रशिक्षणार्थी प्रवेशित असतात. विविध धर्मांतील चांगले गुण प्रशिक्षणार्थ्यांनी आत्मसात करावेत, त्यांची संस्कृती जाणून घ्यावी या उद्देश्याने ईद-ए-मिलाद, दिवाळी, दसरा, नाताळ हे उत्सव साजरे करण्यात आले.

९. होमी भाभा आणि महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय विज्ञानातील प्रतिमानावर प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणास ३० विद्यार्थी व २ प्राध्यापक सहभागी झाले होते.

अशाप्रकारे बी.एड. च्या प्रशिक्षाणार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, विविध कौशल्य निर्मिती, स्वतः बद्दलची जाणीव निर्माण करण्यासाठी वरील कार्यक्रम यशस्वी ठरले.

**ब) महाविद्यालयासंदर्भात :-**

१. विस्तार सेवा मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन विभागातर्फे आयोजित "उडान" महोत्सवात महाविद्यालयास पथनाट्य स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले व पोस्टर मेकिंगला

Chembur Sarvankash Shikshanshastra Mahavidyalaya Mumbai 400 071.

तृतीय क्रमांक मिळाला.

२. प्राध्यापक डॉ. चंद्रशेखर अशोक चक्रदेव यांना मुंबई विद्यापीठाने त्यांनी केलेल्या संशोधन कार्याबद्दल विद्यावाचस्पती पदवी (पीएच.डी.) प्रदान केली आहे. त्यांच्या संशोधन कार्याचा विषय - "A study of teacher Educators' organizational citizenship Behavior in relation to organizational Commitment & organizational Culture" हा होता. सदर विषयासाठी त्यांना महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. विजय द. जवळेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

३. पुणे विद्यापीठातर्फे आयोजित करण्यात आलेल्या Short Term Course (४ ते १० फेब्रुवारी) मध्ये डॉ. चंद्रशेखर अशोक चक्रदेव, डॉ. कशेव रामचंद्र जाधव, डॉ. जयेश रघुनाथ जाधव व श्री. उमाकांत वसंतराव देशमुख हे सहभागी झाले होते. तसेच मुंबई विद्यापीठातर्फे आयोजित करण्यात आलेल्या Short Term Course (११ ते १६ मार्च २०१९) मध्ये प्रा. सुनिता शहा ह्या सहभागी झाल्या होत्या.

४. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये महाविद्यालयातील एकूण ६ प्राध्यापकांनी आंतरराष्ट्रीय चर्चासत्र परिषदांमध्ये सहभाग घेतला तसेच ९ प्राध्यापकांनी राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा, चर्चासत्रात सहभाग घेतला.

५. प्राध्यापिका डॉ. कुसुम वि. चौधरी यांना यावर्षी शिक्षण संवेदन अनुराग प्रकाशन, कल्याण यांच्यातर्फे राज्यस्तरीय सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार मिळाला. त्याचप्रमाणे त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन १४ मार्च, २०१९ रोजी ज्ञानमुद्रा ट्युटोरिअल, कुरार व्हीलेज, मालाड तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. अश्याप्रकारे महाविद्यालयाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी यांचा मोठा वाटा आहे. तसेच चेंबूर एज्युकेशन सोसायटीचे सर्व घटक व व्यवस्थापनाकडून नेहमी मिळणाऱ्या सहकार्यामुळे हे शक्य आहे. सर्वांच्या सहकार्याबद्दल मी शतशः आभार व्यक्त करतो.

Principal
Chembur Sarvankash Shikshanshastra
Mahavidyalaya
R.C. Marg, Chembur, Mumbai - 400 071.

**डॉ. चंद्रशेखर अ. चक्रदेव**
प्रभारी प्राचार्य

Chembur Sarvankash Shikshanshastra Mahavidyalaya
Mumbai 400 071.

# चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय

## ❖ वार्षिक अहवाल २०१९-२० ❖

चेंबूर एज्युकेशन सोसायटीच्या चेंबूर सर्वंकष शिक्षणाशास्त्र महाविद्यालयाचा सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाचा संक्षिप्त अहवाल आपणा समोर सादर करीत आहे.

आत्तापर्यंत यशस्वीरीत्या वाटचाल करीत चेंबूर सर्वंकष शिक्षणाशास्त्र महाविद्यालयाने ४९ व्या वर्षात पदार्पण केले आहे. एन.सी.टी.ई. च्या २०१४ च्या नियमानुसार बी.एड. कोर्स सध्या दोन वर्ष कालावधीचा असून यात चार सत्रांचा समावेश आहे. लेखी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षा यांचे प्रमाण ६०-४० असे असून आंतरवासिता कार्यक्रमास जास्त प्राधान्य देण्यात आले आहे. आंतरवासिता कार्यक्रम दुसऱ्या सत्रात ३ आठवड्याचा, तिसऱ्या सत्रात अकरा आठवड्याचा आणि चौथ्या सत्रात पाच आठवड्याचा असा झाला आहे. स्पर्धेच्या युगात व बदललेल्या परिस्थितीमध्ये मराठी माध्यमात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जरी कमी होत चालली आहे तरी इतर महाविद्यालयांच्या तुलनेत आपल्या महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्यांची संख्या चांगल्या प्रमाणात आहे. या सर्व बदलत्या परिस्थितीची आव्हाने स्वीकारुन महाविद्यालयाची खंबीरपणे प्रगतीपथावर वाटचाल चालू आहे.

**१) विविध उपक्रमासंदर्भात :-**

आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी हा स्मार्ट होऊन बाहेर पडावा यासाठी विविध विषयांवर कार्यशाळांचे आयोजन या शैक्षणिक वर्षात करण्यात आले.

१. डॉ. चंद्रशेखर अशोक चक्रदेव यांनी दिनांक १२ जुलै, २०१९ रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत योग दिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांमध्ये मानसिक शांतता व मनाची प्रसन्नता रहावी यासाठी योग प्रात्यक्षिके सादर केली.

२. दिनांक २८ जुलै, २०१९ रोजी वनसंवर्धनाचे महत्व लक्षात घेऊन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ बी.एड. चे विद्यार्थी, शिक्षक आणि चेंबूर बी.एड. महाविद्यालयाच्या वतीने आरे कॉलनी, गोरेगांव येथे मराठी सिनेतारका श्रीमती शुभांगी गोखले व श्रीमती अनुराधा राज्याध्यक्ष यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. तसेच स्टेट बँक ऑफ इंडिया चेंबूर शाखा आणि चेंबूर बी.एड. कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने चेंबूर एज्युकेशन सोसायटीच्या आवारातही स्वातंत्र्य दिनादिवशी वृक्षारोपणाचा कार्यक्रम झाला.

३. रामकृष्ण मिशनच्या प्रवक्त्या प्रवर्तिका दिव्यानंदपर्णा यांनी दिनांक १४ सप्टेंबर, २०१९ रोजी "Self-Knowledge" या विषयावर व्याख्यान दिले.





४. दिनांक १० ऑक्टोबर २०१९ रोजी जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त "Mental Health Preservation" या विषयावर डॉ. चंद्रशेखर चक्रदेव यांनी व्याख्यान घेतले. यात भावी शिक्षकांनी / प्रशिक्षणार्थ्यांनी आपले मानसिक आरोग्य कसे सांभाळणे आवश्यक आहे याचे महत्व विविध उदाहरणाद्वारे समजावून सांगितले.

५. डॉ. चंद्रशेखर चक्रदेव यांनी दिनांक २३ नोव्हेंबर, २०१९ रोजी "Anger Management" व "Self-Awareness" या विषयांवर कार्यशाळा घेतली. यात क्रोधाचे प्रकार आणि त्यांचे होणारे परिणाम, क्रोधावर नियंत्रणासाठी आवश्यक असणारे सकारात्मक पैलू विविध उदाहरणाद्वारे समजावून सांगितले, तसेच स्व-जाणीव विषयी सुस्पष्टता केली.

६. दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजी राष्ट्रीय महिला आयोग प्रायोजित एक दिवसीय विधी जागरुकता कार्यक्रम () घेण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसोबत एस.एन.डी.टी. विद्यापीठ, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, भावना ट्रस्टचे कॉमर्स महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय चेंबूर आणि साकेत शिक्षणशास्त्र महाविद्यालय कल्याण या पाच महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

७. श्रीमती निर्मल मिलिंद कासेकर यांनी "Medicine Safety & Safe Disposal of Packing Material" या विषयावर कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेत त्यांनी औषधांची सुरक्षा कशी ठेवावी व पॅकिंग सामग्रीची सुरक्षित विल्हेवाट कशी लावावी यासंबंधीत मार्गदर्शन केले. (16 जानेवारी 2020)

८. डॉ. उमाकांत देशमुख यांनी २० जानेवारी २०२० रोजी "Innovative Teaching Learning Strategies" या विषयावर विशेष कार्यशाळा घेतली. प्रत्येक शिक्षकांना अध्यापनाच्या नाविन्यपूर्ण पध्दती माहिती असणे आवश्यक आहे. या दृष्टीकोणातून झालेली कार्यशाळा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाची होती.

९. सामाजिक बांधिलकी लक्षात घेऊन भावी शिक्षकांच्या मनात सामाजिक कार्याविषयी जाणीव व्हावी म्हणून श्रीमती दिपाली गायकवाड आणि सुरेखा सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी 'साद फऊंडेशन', वांगणी, ता. कर्जत, जि. ठाणे येथे समुदाय कार्य पूर्ण केले, तसेच मराठी माध्यमाच्या सर्व प्राध्यापक वृंद व विद्यार्थी यांनी शांतीवन कुष्ठरोग निवारण केंद्र, नेरे पनवेल येथे समुदाय कार्य केले. (3 डिसेंबर 2019)

अशाप्रकारे आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापक आणि बाहेरील तज्ञ व्यक्ती यांना आमंत्रित करुन जीवनाकडे सकारात्मक दृष्टीकोन ठेवून शिक्षक म्हणून भविष्यात चांगले कार्य कशाप्रकारे केले पाहिजे याची जाणीव बी.एड.च्या भावी शिक्षकांना करुन दिली. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, विविध कौशल्य निर्मिती, स्वत:बद्दलची जाणीव निर्माण करण्यात हे सर्व कार्यक्रम यशस्वी ठरले.

२. प्राध्यापक डॉ. उकामांत देशमुख यांना मुंबई विद्यापीठाने त्यांनी केलेल्या संशोधन कार्याबद्दल पी.एचडी. पदवी प्रदान केली आहे. त्यांच्या संशोधन कार्याचा विषय "Innovative Practice in curriculum transaction of teacher education institution of Mumbai & it's diffusion in school" असा होता. सदर विषयासाठी त्यांना महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. विजय द. जवळेकर यांचे मार्गदर्शन लाभले. प्राध्यापक श्री. रविंद्र गो. गांगुर्डे यांना त्यांनी केलेल्या संशोधन कार्याबद्दल श्री. जगदीशप्रसाद झाबरमल टिबडेवाला विश्वविद्यालय, राजस्थान विद्यापीठाने पी.एचडी. पदवी प्रदान केली. त्यांच्या संशोधन कार्याचा विषय "मुंबई विश्वविद्यालय से जुडे अध्यापक महाविद्यालयों के प्रशिक्षणार्थियों की चिंता और व्यक्तित्व गुणों के विकास का आलोचनात्मक अध्ययन" असा होता. सदर विषयासाठी त्यांना आपल्या महाविद्यालयातील डॉ. कुसुम वि. चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच डॉ. केशर जाधव यांनी मुंबई विद्यापीठातून दुसरी पी.एचडी. पदवी इतिहास या विषयात संपादित केली. त्यांच्या संशोधनाचा विषय "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारताच्या जलनीती धोरणातील योगदान" (सन २२ जुलै १९४२ ते २४ ऑगस्ट १९४७) असा होता.

३. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये महाविद्यालयातील सर्वच प्राध्यापकांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्र, कार्यशाळा आणि परिषदांमध्ये सहभाग घेतला.

४. प्राध्यापिका डॉ. कुसुम चौधरी यांना, निर्मला फाउंडेशन साहित्यिक, शैक्षणिक व सामाजिक संस्था गोरेगाव, मुंबई तर्फे या वर्षीचा, "शिक्षा-साहित्य व जनसेवा सन्मान २०१९," हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच दिनांक २६ जानेवारी २०२० रोजी डॉ. कुसुम चौधरी यांना Global Economic Progressive & Research Association New Delhi तर्फे Best Citizen India Gold Medal Award 2020 हा पुरस्कार Individual Achievement & National Development साठी बंगलोर येथे प्रदान करण्यात आला.

५. दिनांक २९ फेब्रुवारी, २०२० रोजी डॉ. चंद्रशेखर चक्रदेव यांना भारत कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स, बदलापूर येथे झालेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात सादर केलेल्या पेपर सादरीकरणास 'Best Paper Presentation Award' मिळाले.





६. दिनांक ३ ऑक्टोबर, २०१९ रोजी Anti-Dowry Movement, Bombay या संस्थेमार्फत आयोजित वक्तृत्व स्पर्धेत महाविद्यालयातील श्री. संजय दाभोळकर यास विशेष प्रमाणपत्र देवून गौरवण्यात आले. दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, चेंबूर येथे शील उत्सवांतर्गत स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना पुढील पारितोषिके मिळाली.

*** Poster Making**

1) Ankita Dandekar - 1st position

*** Education (Individual)**

1) Sanjay Dabholkar - 1st position
2) Ankita Dandekar - 2nd position

*** Debate (Group)**

1) Mahima Kaushik - 2nd position
2) Gunjan Yadav - 2nd position
3) Sanjay Dabholkar - 2nd position

तसेच २५ जानेवारी, २०२० रोजी मुंबई विद्यापीठाच्या विस्तार सेवा अंतर्गत आजीवन अध्ययन विभागातर्फे आयोजित "उडान" महोत्सवात मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना "स्वच्छता आणि कचरा विलगीकरण" या विषयावरील पथनाट्याला द्वितीय क्रमांक व पोस्टर मेकिंग स्पर्धेत उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले. अशाप्रकारे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यासाठी घेण्यात आलेले विविध शिक्षणविषयक उपक्रम, चर्चासत्र, कार्यशाळा आणि इतर अनेक उपक्रम यांनी महाविद्यालयाच्या गुणवत्तेत सातत्याने भर घातली. अशा प्रकारे महाविद्यालय उत्तरोत्तर प्रगती करीत आहे. ही वाट जरी बिकट असली तरी वेळोवेळी व्यवस्थापनाकडून मिळणाऱ्या सहकार्यामुळे ती सुकर होत जाते. चेंबूर एज्युकेशन सोसायटीचे सर्व घटक पूर्व प्राथमिक विभाग, प्राथमिक विभाग, माध्यमिक विभाग आणि रात्र शाळा, यांचे सहकार्य महाविद्यालयास प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे मिळत असते. शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचा न दिसून येणारा, परंतु वास्तविकेत असणारा मोठा वाटा या प्रगतीमध्ये असतो. वेळोवेळी दिलेली जबाबदारी पूर्णत्वास नेणाऱ्या प्राध्यापक मंडळींचा सहयोग, विद्यार्थी, माजी विद्यार्थी व पालकवर्ग यांचे प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे मिळणारे सहकार्य महाविद्यालयास यशाच्या प्रगतीपथावर घेवून जाते. या सर्वांच्या सहकार्याबद्दल मी शतशः आभार व्यक्त करतो.

डॉ. चंद्रशेखर अशोक चक्रदेव
प्रभारी प्राचार्य
चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय

Principal
Chembur Sarvankash Shikshanshastra
Mahavidyalaya
R.C. Marg, Chembur, Mumbai - 400 071.

वार्षिक अहवाल (Annual Report 2020-21) वार्षिक अहवाल



## चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय
## वार्षिक अहवाल - २०२० - २१

आत्तापर्यंत यशस्वी वाटचाल करीत चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालयाने ५० व्या वर्षात पदार्पण केले आहे. एन.सी.टी.ई च्या २०१४ च्या नियमानुसार बी.एड. कोर्स सध्या तरी दोन वर्ष कालावधीचा असून यात चार सत्रांचा समोवश आहे. लेखीपरीक्षा प्रमाण ६०% असून ४०% प्रात्यक्षिक परीक्षेवर भर देण्यात आला आहे. त्याच बरोबर आंतरवासिता कालावधीस जास्त प्राधान्य देण्यात आले आहे. आंहर वासिता दुसऱ्या सत्रात तीन आठवडे, तिसऱ्या अकरा आठवडे आणि चौथ्या सत्रात पाच आठवडे असा कालावधी झाला आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात व बदललेल्या परिस्थितीमध्ये ही मराठी माध्यमांच्या कॉलेजात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जरी कमी होत असली तरी आपल्या महाविद्यालात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पूर्ण क्षमतेत आहे. या वर्षी तर कोरोनासारख्या महामारीच्या काळातही बदलत्या परिस्थितीची आव्हाने स्वीकारुन महाविद्यालयाची खंबीरपणे प्रगतीपथावर वाटचाल चालू आहे.

अ) **विविध उपक्रमां संदर्भात :** आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच सर्वांगिण विकास व्हावा, बाहेरील स्पर्धात्मक समाजात त्यांच्या टिकाव लागावा यासाठी विविध विषयांवर कार्यशाळांचे आयोजन या शैक्षणिक वर्षात करण्यात आले.

१) १ जून २०२० रोजी भावी शिक्षकांमध्ये पर्यावरणाची जाण निर्माण व्हावी या हेतूने श्री मराठे, इंडोनेशिया Saving the World यांचे या विषयांवर वेबीनारचे आयोजन केले गेले.

२) ६ जून २०२०, रोजी डॉ. जयेश जाधव यांनी यांनी Job Creation through Digitial Revolution या विषयावर कार्यशाळा घेतली.

३) दिनांक २० जून २०२० रोजी डॉ. चंद्रशेखर चक्रदेव यांनी अष्टांग योग या विषयावर चर्चासत्र घेतले.

४) दिनांक २४ ऑगस्ट २०२० रोजी डॉ. उमाकांत देशमुख यांनी Video Making या विषयांवर कार्यशाळा घेतली.





५) दिनांक २९ ऑगस्ट २०२०, डॉ. जयेश जाधव यांना PPT to Video Conversion या विषयांवर कार्यशाळा घेतली.

६) दिनांक २९ ऑगस्ट २०२०, रोजी डॉ. उमाकांत देशमुख यांनी E-content Development या विषयावर व्याख्यान दिले.

७) दिनांक २९ ऑगस्ट, २०२० रोजी डॉ. चद्रशेखर चक्रदेव यांनी Yoga psychology या विषयावर प्रात्यक्षिकांसह व्याख्यान दिले.

८) दिनांक २१ सप्टेंबर २०२० रोजी डॉ. जयेश जाधव यांनी How to download copyright free Image या विषयावर कार्यशाळा घेतली.

९) दिनांक ३० सप्टेंबर २०२०, रोजी डॉ. जयेश जाधव यांनी How to uplod / paste scanned PDF Document in google from या विषयावर कार्यशाळा घेतली.

१०) दिनांक २६ नोव्हेंबर २०२२० संविधान दिन साजरा करण्यात आला. या वेळी प्रा. डॉ. अशिष बोरखे यांच्या व्याख्यानाचा आस्वाद सर्व विद्यार्थ्यांनी व प्राध्यापक यांनी घेतला.

११) दिनांक ६ जानेवारी ते २८ जानेवारी २०२१ या कालावधीत महाविद्यालयातील सर्व प्रशिक्षणार्थी व प्राध्यापक वर्ग यांना MPC Online Training programee, CSR Mahindra Pride Class room तर्फे प्रशिक्षण देण्यात आले.

१२) दिनांक १८ फेब्रुवारी २०२१ रोजी महाविद्यालयातील महिलाविकास कक्ष व अहान फाऊंडेशन टीम नेटीसम यांच्या सहाय्याने सायबर सखे हा कार्यक्रम घेण्यात आला.

१३) दिनांक २७ फेब्रुवारी २०२१ रोजी महाविद्यालयातील महिलाविकास कक्षा तर्फे in Service Traders साठी Building Digital Guardians हा कार्यक्रम घेतला गेला.

प्राचार्य
चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय
आर. सी. मार्ग, चेंबूर नाका, चेंबूर, मुंबई-४०००७१.

Chembur Sarvankash Shikshanshastra Mahavidyalaya Mumbai 400 071. Chembur

१४) दिनांक २ एप्रिल २०२१, रोजी चें. स.शि.म. श्री. जयेश शिंदे, श्रीमती मिना सालढाना, मिस ग्लॉडी गोल्सान्वीस यांनी आपल्या प्रशिक्षणार्थ्यांना Certificate Cours for Teacher Education in International School या बद्दल उद्‌बोधन केले.

१५) बहाई अॅकडमी, पाचगणी यांच्या तर्फे दिनांक ६ ते ११ मार्च २०२१ या कालावधीत ६ दिवसांची Self Development & Capacity Building for Teachers या संदर्भात कार्यशाळा घेतली गेली.

१६) अहवाल काळात डॉ. चक्रदेव, डॉ. कुसुम चौधरी, डॉ. देशमुख, डॉ. केशर जाधव व डॉ. जयेश जाधव यांनी विविध शैक्षणिक विषयावर FDA पूर्ण केले.

ब) शैक्षणक वर्ष २०२०-२१ या मध्ये महाविद्यालयीन विद्यार्थी परिषदेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

अशाप्रकारे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यासाठी घेण्यात आलेले ऑनलाईन विविध उपक्रम शिक्षणविषयक कार्यशाळा यांनी महाविद्यालयाच्या गुणवत्तेत सातत्याने भर घातली. महाविद्यालयात अशा प्रकारे दिवसें दिवस प्रगती करीत आहे. कोविड-१९ च्या परिस्थिती मध्ये ही वाट जरी बिकट असले तरी वेळोवेळा व्यवस्थापनाकडून मिळणाऱ्या सहकार्यामुळे ही सुकर होत गेली. चेंबूर एज्युकेशन सोसायटी सर्व घटक पूर्व प्राथमिक विभाग, प्राथमिक विभाग, माध्यमिक विभाग आणि रात्र शाळा यांचे सहकार्य महाविद्यालयास प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे नेहमीच मिळत असते. महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांचा न दिसून येणारा, परंतु वास्तविकेत असणारा मोठा वाटा या प्रगती मागे असतो. वेळोवेळी दिलेली सर्व जबाबदारी पूर्ण त्वास नेणारे प्राध्यापक मंडळी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी व पालक वर्ग यांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे मिळणारे सहकार्य महाविद्यालयास यशाच्या प्रगतीपथावर घेवून जाते या सर्वांच्या सहकार्या बद्दल मी शतश: आभार व्यक्त करतो.

सर्व प्राध्यापक , आजी-माजी विद्यार्थी व पालक वर्ग यांच्या सहकार्याबद्दल शतश: आभार

डॉ. चंद्रशेखर चक्रदेव
(प्रभारी प्राचार्य)

प्राचार्य
चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय
आर. सी. मार्ग, चेंबूर नाका, चेंबूर, मुंबई-४०००७१.

( Annual Report 2021-22 )

Chembur Sarvankash Shikshanshastra Mahavidyalaya
Mumbai
400 071.
★ Chembur ★



# चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय

## वार्षिक अहवाल

## (२०२१-२२)

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या सर्व उपक्रमांचा केंद्रबिंदू विद्यार्थी होता.

२०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील विविध कार्यक्रमांचा संक्षिप्त आढावा पुढील प्रमाणे आहे.

१) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात आपल्या महाविद्यालयातील शिक्षकवृंदांनी विविध प्रकारचे प्रशिक्षण कार्यक्रम, फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम ऑनलाईन प्रणालीने पूर्ण केले ते पुढील प्रमाणे.

| शिक्षकवृंदाचे नाव | आयोजन करणारी संस्था | विषय | कालावधी |
|---|---|---|---|
| डॉ. चंद्रशेखर चक्रदेव | सनातन धर्म कॉलेज अंबाला कांट | १० दिवसीय ऑनलाईन सर्टिफिकेट कोर्स इन डाटा एनालिसीस युझींग पायथॉन लायब्ररीज | २५ मे २०२१ ते ४ जून २०२१ 12th June |
| डॉ. चंद्रशेखर चक्रदेव | रामानुजन कॉलेज दिल्ली | डाटा एनालिसीस युझींग आर - | १५ जून २०२१ ते २१ जून २०२१ 3rd July |
| डॉ. चंद्रशेखर चक्रदेव | सनातन धर्म कॉलेज अंबाला कांट | प्रोफेशनल डॉक्युमेंट विथ मायक्रोसॉफ्ट वर्ड | २१ जून २०२१ ते ३० जून २०२१ 6th July |
| डॉ. चंद्रशेखर चक्रदेव | सनातन धर्म कॉलेज अंबाला कांट | मास्टरींग एक्सेल टूर फ्रॉम बिगीनर टू ॲडव्हान्स | २१ जुलै २०२१ ते ३० जुलै २०२१ 9th July |
| डॉ. उमाकांत देशमुख | भारत कॉलेज ऑफ आर्टस् आणि कॉमर्स बदलापूर | डाटा एनालिसीस युझींग एम.एस.एक्सेल फॉर रिसर्च इन सोशल सायन्स | २६ जुलै २०२१ ते ३१ जुलै २०२१ 7th Aug |

Principal
Chembur Sarvankash Shikshanshastra
Mahavidyalaya
R.C. Marg, Chembur, Mumbai - 400 071.

| शिक्षकवृंदाचे नाव | आयोजन करणारी संस्था | विषय | कालावधी |
|---|---|---|---|
| प्रा. दिपाली गायकवाड | रामानुजन कॉलेज दिल्ली | रिफ्रेश कोर्स इन मुक ७.० | ५ ऑगस्ट २०२१ ते १९ ऑगस्ट २०२१ |
| प्रा. विभावरी शिगवण | रामानुजन कॉलेज दिल्ली | रिफ्रेश कोर्स इन मुक ७.० | ५ ऑगस्ट २०२१ ते १९ ऑगस्ट २०२१ |
| डॉ. उमाकांत देशमुख | स्वयम | रिसर्च इन टेक्नीकल एज्यूकेशन | ८ आठवडे |
| डॉ. चंद्रशेखर चक्रदेव | सनातन धर्म कॉलेज अंबाला कांट | डिझाईन हॅसल फ्री वेबसाईट विथ वर्डप्रेस | १ सप्टेंबर २०२१ ते १० सप्टेंबर २०२१ |
| डॉ. चंद्रशेखर चक्रदेव | सनातन धर्म कॉलेज अंबाला कांट | एमब्रेसींग डिजीटल टूल्स फॉर कंटेंट मास्टर्स | १ ऑक्टोबर २०२१ ते १० ऑक्टोबर २०२१ |
| डॉ. चंद्रशेखर चक्रदेव | सनातन धर्म कॉलेज अंबाला कांट | ओपन सोर्स रिसोर्स फॉर रिसर्च | २१ ऑक्टोबर २०२१ त ३० ऑक्टोबर २०२१ |
| डॉ. चंद्रशेखर चक्रदेव | स्वयम | सॉफ्ट स्कील फॅकल्टी डेवलपमेंट प्रोग्राम | ४ आठवडे |
| डॉ. जयेश जाधव | स्वयम | बॉडी लॅन्गेज फॅकल्टी डेवलपमेंट प्रोग्राम | ४ आठवडे |
| डॉ. उमाकांत देशमुख | नॉलेज ब्रीज | ॲडव्हान्स ओबीएस | १५ फेब्रुवारी ते २१ फेब्रुवारी |





२) चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि एच.बी.बी.एड. कॉलेज वाशी आणि सालिपूर स्वायत्त महाविद्यालय ओडिशा यांच्या संयुक्त विद्यमाने २१ जून २०२१ रोजी 'Psychological Perspective of Ashtanga Yoga' या विषयावर राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले.

३) २६ जून २०२१ रोजी "Conflict Resolution" या विषयावर डॉ. चंद्रशेखर चक्रदेव यांनी ऑनलाईन कार्यशाळा घेतली.

४) १९ जून २०२१ रोजी विद्यार्थी परिषदेच्या वतीने "जागतिक पर्यावरण दिन" ऑनलाईन पध्दतीने साजरा करण्यात आला.

५) १० जुलै २०२१ रोजी विद्यार्थी परिषदेच्या वतीने "जागतिक लोकसंख्या दिवस" ऑनलाईन पध्दतीने साजरा करण्यात आला.

६) २४ जुलै २०२१ रोजी गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम संस्थेच्या वतीने साजरा करण्यात आला.

७) १ ऑगस्ट २०२१ रोजी विद्यार्थी परिषदेच्या वतीने लोकमान्य टिळक यांचे पुण्यस्मरण करण्यात आले.

८) १ ऑगस्ट २०२१ रोजी विद्यार्थी परिषदेच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली.

९) २६ ऑगस्ट २०२१ रोजी विद्यार्थी परिषदेच्या वतीने Women's Equal Day ऑनलाईन पध्दतीने साजरा करण्यात आला.

१०) १५ सप्टेंबर २०२१ रोजी विद्यार्थी परिषदेच्या वतीने हिंदी दिवस ऑनलाईन पध्दतीने साजरा करण्यात आला.

११) ११ ऑक्टोबर २०२१ रोजी चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि सोसायटी फॉर सोशल एम्पॉवरमेंट ॲण्ड ट्रेनिंग (SSET) यांच्या संयुक्त विद्यमाने धनज्ञान व आर्थिक साक्षरता कार्यक्रम ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आला.

१२) २१ ऑक्टोबर २०२१ रोजी माजी विद्यार्थी संघातर्फे श्रीमती अदिती माधवन यांचे "Sustainable Menstruation Practices" या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.

१३) २६ नोव्हेंबर २०२१ रोजी विद्यार्थी परिषदेच्या वतीने संविधान दिन ऑनलाईन पध्दतीने यशस्वीरित्या साजरा करण्यात आला.

१४) २७ नोव्हेंबर २०२१ रोजी डॉ. मिनाक्षी इंगोले सहाय्यक प्राध्यापिका शिक्षणशास्त्र विभाग-दिल्ली विद्यापीठ यांचे "Awareness about cyberbullying of femals in Indian Higher Education Institutions" या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.



Chembur Sarvankash Shikshanshastra Mahavidyalaya Mumbai 400 071. Chembur

१५) २७ नोव्हेंबर २०२१ रोजी डॉ. चंद्रशेखर चक्रदेव यांना बारत कॉलेज ऑफ आर्टस् आणि कॉमर्स आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत बेस्ट रिसर्च पेपर प्रेझेंटेशन अवार्ड मिळाले.

१६) ६ डिसेंबर २०२१ रोजी चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि विद्या प्रबोधिनी कॉलेज ऑफ कॉमर्स, एज्युकेशन गोवा यांच्या संयुक्त विद्यमाने 'Mental Health & Well Being' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनार संपन्न झाला.

१७) २३ डिसेंबर २०२१ रोजी 'Attaining Sustainable Development Goals (ASDGs) through Curriculum' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

१८) १ डिसेंबर २०२१ रोजी विद्यार्थी परिषदेच्या वतीने AIDS जागरकता दिवस संपन्न झाला.

१९) १७ जानेवारी २०२२ रोजी चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालया तर्फे 'Advance Certificate Course on Action Research' इंग्रजी माध्यमातून सुरु करण्यात आला.

२०) १८ जानेवारी २०२२ रोजी चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालया तर्फे 'Advance Certificate Course on Action Research' मराठी माध्यमातून सुरु करण्यात आला.

२१) २४-२६ फेब्रुवारी २०२२ दरम्यान आपल्या महाविद्यालयात Pre. Ph.D. कोर्स संपन्न झाला.

२२) २६ फेब्रुवारी २०२२ रोजी मराठी भाषा दिन विद्यार्थी परिषदेच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला.

२३) २८ फेबुवारी २०२२ रोजी विद्यार्थी परिषदेच्या वतीने राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

२४) ८ मार्च २०२२ रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिन विद्यार्थी परिषदेच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त डॉ. चंद्रशेखर चक्रदेव यांचे 'Sexual Harassment of Women & Visakha Guidelines' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.

२५) १२ मार्च २०२२ रोजी 'Anger management' आणि 'Nurturing Self Esteem' या विषयावर डॉ. चंद्रशेखर चक्रदेव यांची कार्यशाळा संपन्न झाली.

२६) २७ मार्च २०२२ रोजी आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत योग प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते.

२७) १९ मार्च २०२२ रोजी मुंबई विद्यापीठाच्या DLLE विभागामार्फत आयोजित उडान कार्यक्रमात आपल्या महाविद्यालयाची विद्यार्थिनी श्रीमती दिप्ती चव्हाण हिस वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

२८) ११ मार्च, १९ मार्च आणि २१ मार्च २०२२ रोजी डॉ. शिरोडकर स्पेशल स्कूल-परळ आणि ५ एप्रिल २०२२ रोजी NASEOH चेंबूर येथे समुदाय कार्य यशस्वीरित्या संपन्न झाले.





Chembur Sarvankash Shikshanshastra Mahavidyalaya Mumbai 400 071. Chembur

२९) ३ एप्रिल २०२२ रोजी 'Intellectual Property Rights-Creative India, Innovative India' या विषयावर डॉ. चंद्रशेखर चक्रदेव यांनी कार्यशाळा घेतली.

३०) १६ एप्रिल २०२२ रोजी जागतिक आरोग्य दिनानिमित्त सूर्यनमस्कार या विषयावर डॉ. चंद्रशेखर चक्रदेव यांनी दिग्दर्शनासह कार्यक्रम घेतला.

३१) १६ एप्रिल २०२२ रोजी चेंबूर (सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि TATA Son's Pro Engage Project 'Arogya Mitra' यांच्या सयुंक्त विद्यमाने HIV-AIDS जागरुकता कार्यक्रम घेण्यात आला.

३२) २५ एप्रिल २०२२ रोजी चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि पिल्लई कॉलेज ऑफ एज्यूकेशन आणि मुंबई विद्यापीठाच्या Board of Studies (BOS) in Education यांच्या संयुक्त विद्यमाने कृती संशोधन परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यात झालेल्या सादरीकरण स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी श्रीमती क्रीती भाटीया आणि श्रीमती अजेना जोस यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

३३) २० एप्रिल २०२२ रोजी सगुणा बाग नेरळ येथे विद्यार्थ्यांसाठी (Agro Tour) कृषी भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

३४) २१ ते २३ एप्रिल २०२२ रोजी महाबळेश्वर येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

३५) ७ मे २०२२ रोजी २०१८-२० आणि २०१९-२१ या बॅचच्या विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभ आयोजित करण्यात आला होता. डॉ. बळीराम गायकवाड प्राचार्य कोकण ज्ञानपीठ उरण हे या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

३६) १९ मे २०२२ रोजी बी.एड. च्या २०२०-२२ च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता.

३७) ३१ मे २०२२ रोजी आपल्या महाविद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापिका डॉ. कुसूम चौधरी सेवा निवृत्त झाल्या.

आपल्या महाविद्यालयाचे नाव सार्थक ठरेल अशा प्रकारे विद्यार्थ्यांचा सर्वंकष विकास साधण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम ऑफलाईन आणि ऑनलाईन माध्यमातून संपन्न झाले.

धन्यवाद.

प्राचार्य
डॉ. चंद्रशेखर अशोक चक्रदेव
(चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय)

प्राचार्य
चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय
आर. सी. मार्ग, चेंबूर नाका, चेंबूर, मुंबई-४०००७१.

।। उध्दरेदात्मनात्मानम् ।।

# चेंबूर एज्युकेशन सोसायटी (ट्रस्ट)

स्थापना : १९४६

(सोसायटी रजिस्ट्रेशन व मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट अन्वये रजिस्टर्ड)

नोंदणी क्र. एफ-३२३ (मुंबई)

स्वामी विवेकानंद चौक, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग,

चेंबूर, मुंबई - ४०० ०७१.

## वार्षिक कार्यवृत्तांत

## व

## जमाखर्चाचा ताळेबंद

## २०२२-२०२३



Chembur Sarvankash Shikshanshastra Mahavidyalaya Mumbai 400 071. Chembur

# चेंबूर सर्वंकष शिक्षण शास्त्र महाविद्यालय

## वार्षिक अहवाल २०२२-२०२३

२ जुलै २०२२ रोजी आठवा आंतराष्ट्रीय योग दिवस उत्साहाने संपन्न झाला.

९ जुलै २०२२ रोजी Soft Skill Training Programme - I अंतर्गत 'Time Management' आणि 'Communication Skills' या विषयावर श्रीमती मीनाक्षी पाटील आणि श्रीमती शिल्पा पुरव यांनी कार्यशाळा घेतली.

१३ जुलै २०२२ रोजी 'Do We Want International School or Not' या विषयावर गुरुपौर्णिमा कार्यक्रमांतर्गत वादविवाद स्पर्धा घेण्यात आली.

१३ जुलै २०२२ रोजी Soft Training Programme - II अंतर्गत आणि 'Interveiwing Skill' आणि 'Nurturing Self Confidence with Self Motivation' या विषयावर श्रीमती अल्मास कुरेशी आणि श्रीमती अशरफिया बच्चू यांनी कार्यशाळा घेतली.

१३ जुलै २०२२ रोजी "9E of Constructivism" या विषयावर श्रीमती मीनाक्षी पाटील यांनी कार्यशाळा घेतली.

१६ जुलै २०२२ रोजी 'Learning Disability : A Current concern in Education' या विषयावर श्रीमती शिल्पा पुरव यांनी कार्यशाळा घेतली.

१९ जुलै २०२२ ते २७ जुलै २०२२ डॉ. उमाकांत देशमुख यांनी 'Professional Audio Recording & Editing Online Course' या विषयावर 'Knowledge Bridge Platform' आयोजित प्रशिक्षण पूर्ण केले.

२० जुलै २०२२ रोजी प्राचार्य डॉ. चक्रदेव यांनी 'Diploma in Yoga Shikshak' ही पदवी संपादन केली.

२३ जुलै २०२२ रोजी 'Quality Education : A current concern in Education' या विषयावर श्रीमती शिल्पा पुरव यांचे प्रबोधनपर व्याख्यान संपन्न झाले.

३० जुलै २०२२ रोजी 'प्राचीन नाणे प्रदर्शन' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. श्री. श्रीकांत कुलकर्णी यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

२ ऑगस्ट २०२२ रोजी शिक्षक प्रशिक्षकांनी आंतरसेवाकाळात नागपंचमी सण 'सर्प आणि अंधश्रद्धा' या विषयावर कार्यशाळा घेवून साजरा केला.

१२ ऑगस्ट २०२२ श्रीमती नियती समीर सुर्वे या विद्यार्थिनीस आझादी का अमृत महोत्सव या

PRINCIPAL
Chembur Sarvankash Shikshanshastra
Mahavidyalaya
Ramkrishnan Chemburkar Marg,
Chembur Naka, Mumbai 400 071

कार्यक्रमांतर्गत विमेन ग्रॅज्युएट युनिअन आयोजित कार्यक्रमात नृत्याविष्कार सादर केल्याबद्दल विशेष प्रमाण देवून गौरवण्यात आले.

१८ ऑगस्ट २०२२ रोजी 'Managerial Thoughts from Lord Krishna's Life' या विषयावर सादरीकरणाद्वारे गोकुळाष्टमी साजरी झाली.

२७ ऑगस्ट २०२२ रोजी संजय गांधी उद्यान - बोरीवली येथे शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांची एकदिवसीय शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली होती.

२७ ऑगस्ट २०२२ रोजी प्राचार्य डॉ. चक्रदेव यांनी श्री. मालवी मंडल हायस्कूल - ठाणे आणि बाल विद्यामंदिर आणि के. बी. सी. ज्युनियर कॉलेज ठाणे आयोजित कार्यक्रमात 'Innovative Teaching Methods & Techniques' या विषयावर कार्यशाळा घेतली.

५ सप्टेंबर २०२२ रोजी शिक्षक दिन उत्साहाने साजरा करण्यात आला.

१३ सप्टेंबर २०२२ रोजी श्रीमती स्मिता गणात्रा यांनी 'Reflective Thinking & Critical Thinking' या विषयावर कार्यशाळा घेतली.

१४ सप्टेंबर २०२२ रोजी हिंदी दिवस उत्साहाने साजरा करण्यात आला.

१६ सप्टेंबर २०२२ रोजी 'Constructivism' या विषयावर श्रीमती स्मिता गणात्रा यांनी कार्यशाळा घेतली.

१९ सप्टेंबर २०२२ रोजी 'Concept of Metacognition' या विषयावर कृतीजन्य अध्ययनाद्वारे श्रीमती स्मिता गणात्रा यांनी कार्यशाळा घेतली.

२१ सप्टेंबर ते २६ सप्टेंबर २०२२ रोजी UGC मान्यता प्राप्त Faculty Development Programme महाविद्यालयातील पुढील शिक्षकांनी यशस्वीरीत्या पूर्ण केला.

१) श्रीमती स्मिता गणात्रा २) डॉ. उमाकांत देशमुख ३) डॉ. चंद्रशेखर चक्रदेव

२२ सप्टेंबर २०२२ - 'Geogebra : An online tool for Mathematics teaching' या विषयावर डॉ. उमाकांत देशमुख यांनी कार्यशाळा घेतली.

२३ सप्टेंबर २०२२ रोजी 'Communication Skill & Transaction Analysis' या विषयावर श्रीम. स्मिता गणात्रा यांनी कार्यशाळा घेतली.

२३ सप्टेंबर २०२२ रोजी डॉ. जयेश जाधव यांनी 'Personality Development through Hypnotism या विषयावर कार्यशाळा घेतली.

२४ सप्टेंबर २०२२ रोजी 'Brain Based Learning' आणि 'Experiential Learning' या विषयावर प्राचार्य डॉ. चक्रदेव यांनी कार्यशाळा घेतली.





Chembur Sarvankash Mumbai 400 071

२६ सप्टेंबर २०२२ रोजी 'Cyber Crime & Women Safety' या विषयावर मुंबई क्राईम ब्रांचच्या सहकार्याने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

२७ सप्टेंबर २०२२ 'Library Survey for Mathematics' या विषयावर डॉ. उमाकांत देशमुख यांनी कार्यशाळा घेतली.

६-८ ऑक्टोबर २०२२ 'Pidilite' आणि चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'Art Intergrated Education' या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली.

७ ऑक्टोबर २०२२ डॉ. चंद्रशेखर चक्रदेव यांनी 'Video Based Lesson' या विषयावर कार्यशाळा घेतली.

८ ऑक्टोबर २०२२ 'Art Integrated Education' या कार्यशाळेत निर्मित साधनांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

८. ऑक्टोबर २०२२ 'Converting HEI to Multidisciplinary Institute' या विषयावर डॉ. चंद्रशेखर चक्रदेव यांनी व्यवस्थापन सदस्यांसाठी सादरीकरण केले.

१५ ऑक्टोबर २०२२ 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.

१८ ऑक्टोबर २०२२ चेंबूर सर्वंकष शिक्षण शास्त्र महाविद्यालय आजी-माजी विद्यार्थी आयोजित दिवाळी पहाट कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

१५ ऑक्टोबर २०२२ विस्तार सेवा अंतर्गत उपक्रम : मुंबई विद्यापीठाच्या DLLE या विस्तार सेवा उपक्रमांतर्गत खालील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

'The Girl Child' विषयावर वादविवाद स्पर्धा घेण्यात आली.

स्त्रियांचा दर्जा : काल, आज आणि उद्या या विषयावर पेपर सादरीकरण करण्यात आले.

'द्वारका बातचित विथ कमला भसिन' यांच्या 'Aggressive Masculinity' या विषयावर विडीओ दाखवून त्यावर आधारित चर्चा घेण्यात आली.

२२ नोव्हेंबर २०२२ रोजी डॉ. चंद्रशेखर चक्रदेव यांची विद्यापीठ मान्यता प्राप्त प्राचार्य म्हणून पाच वर्षासाठी नियुक्ती करण्यात आली.

२७ नोव्हेंबर २०२२ 'Handling The Jealousy and Stress' या विषयावर मनःशक्ती केंद्र लोणावळा यांच्या तर्फे डॉ. वैशाली तुपट यांचे व्याख्यान संपन्न झाले.

४ डिसेंबर २०२२ चेंबूर हायस्कूल आणि चेंबूर सर्वंकष शिक्षण शास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'आझादी का अमृत महोत्सव' अंतर्गत योग प्रात्यक्षिक सत्र संपन्न झाले.

१०डिसेंबर २०२२ 'Creating a Compassionate Classroom' या विषयावर श्रीमती फरिदा

बुघडीवाला - पोदार इंटरनॅशनल स्कूल यांचे व्याख्यान संपन्न झाले.

१० डिसेंबर २०२२ 'Innovative Pedagogy for Science Teaching' या विषयावर माजी विद्यार्थिनी श्रीमती शाइस्ता अन्सारी यांची कार्यशाळा संपन्न झाली.

४-३० जानेवारी 'Certificate Course on Modi (मोडी) Script यशस्वीरित्या संपन्न झाला.

८ जानेवारी २०२३ चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि श्री. बापुसाहेब डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा 'Research Methodology in Education' या विषयावर संपन्न झाली.

१२ जानेवारी २०२३ रामकृष्ण मिशन मुंबई यांच्यातर्फे स्वामी विवेकानंद जयंती महोत्सवानिमित्त आयोजित निबंध लेखन स्पर्धेत श्रीमती शेख सना या विद्यार्थिनीस द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

१२ जानेवारी २०२३ विद्यार्थ्यांना MOOC आणि SWAYAM कोर्सेस बाबत उद्‌बोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

१३ जानेवारी २०२३ 'Video Based Discusion on Gender Sensitization ह्या विषयावर डॉ. चंद्रशेखर चक्रदेव यांनी चर्चासत्र घेतले.

२४ जानेवारी २०२३ संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान आयोजित स्पर्धेसाठी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पर्यवेक्षण करुन आपले योगदान दिले.

२८ जानेवारी २०२३ 'Plastic Disposal Ambassador' या विषयावर सोसायटी फॉर सोशल एम्पॉवरमेंट आणि बिसलरी यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळा संपन्न झाली.

३० जानेवारी २०२३ 'Certificate Course in Spoken Sanskrit' यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आला.

१-३ फेब्रुवारी २०२३ 'Capacity Building Programme चे आयोजन खालील महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

१) S. T. कॉलेज ऑफ एज्युकेशन - मुंबई
२) बॉम्बे टीचर्स ट्रेनिंग कॉलेज - कुलाबा
३) गोखले कॉलेज ऑफ एजयुकेशन - परेल

सदर कार्यक्रमात पुढील विषयांवर कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या.

Self Awareness Enhancing Self Esteem, Anger Management, Stress Management, Conflict Management, Mental Health and Well Being.





४ फेब्रुवारी २०२३ 'Game Based Learning' या विषयावर श्रीमती फातिमा राजकोटवाली यांची कार्यशाळा संपन्न झाली.

७ फेब्रुवारी २०२३ ॲड. आशिष शिगवण यांचे 'Transgender Issues & Challenges' यांचे विषयावर व्याख्यान संपन्न झाले.

१६ फेब्रुवारी २०२३ UDAAN - 2023 या मुंबई विद्यापीठाच्या विस्तार सेवांतर्गत कार्यक्रमात महाविद्यालयास पुढील बक्षीसे मिळाली.

१. वक्तृत्व स्पर्धा - तृतीय पारितोषिक - वरुणा पाटील

२. पोस्टर्स मेकींग स्पर्धा - उत्तेजनार्थ बक्षीस - १) श्रीमती शीतल गायकवाड.

२) श्रीमती साक्षी खांडेकर

३. पोवाडा गायन स्पर्धा - उत्तेजनार्थ बक्षीस

२० फेब्रुवारी २०२३ मानसशास्त्रज्ञांचे जीवन चरित्र या प्रदर्शन आयोजन करण्यात आले होते.

२८ फेब्रुवारी २०२३ मराठी भाषा दिवस उत्साहाने साजरा करण्यात आला.

८ मार्च २०२३ रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिन विद्यार्थी परिषदे तर्फे उत्साहाने साजरा करण्यात आला.

१०-१३ मार्च २०२३Moral Capability : Beauty Knowldge & Transition या विषयावर डॉ. चंद्रशेखर चक्रदेव आणि डॉ. उमाकांत देशमुख यांनी Baha'i Academy पाचगणी येथे प्रशिक्षण पूर्ण केले. Baha'i Academy तर्फे Ambassador of Universal Human Values for Continuous Collaboration सन्मानित करण्यात आले.

११ मार्च २०२३ रोजी मामाचे गाव बोईसर येथे शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या साठी शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

१९ मार्च २०२३ रोजी 'Research Methodology in Education' या विषयावर गुरुकृपा कॉलेज ऑफ एज्यूकेशन ॲण्ड रिसर्च आणि चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

६ एप्रिल २०२३ रोजी श्रध्दानंद महिलाश्रम वसई आणि हॅप्पी फ्लॉक फाउंडेशन पळसदरी कर्जत येथे समुदाय कार्य यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले.

Chembur Sarvankash Shikshanshastra Mahavidyalaya Mumbai 400 071. Chembur

२१ एप्रिल २०२३ लायन्स पायोनियर या शाळेच्या शिक्षक वृन्दांकरीता योग सत्र, Listening Skill, आणि Conflict Management या विषयावर कार्यशाळा डॉ. चक्रदेव यांनी घेतली.

२७-२८ एप्रिल २०२३ रोजी 'I for Inclusion ही कार्यशाळा Xavier's Resource Center for the visually challange (XRCVC) आणि चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झाली.

२६ एप्रिल २०२३ अंगणवाडी सेविकांसाठी वेळेचे नियोजन ही कार्यशाळा घेण्यात आली.

२९ एप्रिल २०२३ रोजी चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि पिल्लई कॉलेज ऑफ एज्यूकेशन-चेंबूर यांच्या संयुक्त विद्यमाने कृती संशोधन पेपर सादरीकरण स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या श्रीमती अंकिता कुळये, श्रीमती गायत्री शर्मा आणि श्रीमती वरुणा पाटील यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

१५ मे २०२३ प्रा. स्मिता गणात्रा यांनी 'Reflective Thinking : How to be boring teacher' या विषयावर कार्यशाळा घेतली.

१६ मे २०२३ संस्कृत विषयासाठी कॅम्पस इंटरव्ह्यू श्री. वल्लभ आश्रम इंग्लिश मिडीयम स्कूल आणि चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आला.

१६ मे २०२३ श्रीमती पूर्वा चोरगे ह्या २०१८-२० बॅचच्या माजी विद्यार्थिनीने विद्यमान B.Ed. च्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणात्मक व्याख्यान दिले.

१८ मे २०२३ 'Environment Project and Act' या विषयावर श्रीमती स्मिता गणात्रा यांच्या मार्गदर्शनाखाली सेमिनार संपन्न झाला.

१८ मे २०२३ 'Lifestyle for Environment & Conservation of every resources' या विषयावर डॉ. मंजुला भंडारी आणि डॉ. विभावरी निकम यांच्या मार्गदर्शनाखाली सेमिनार यशस्वीरित्या पार पडला.

२० मे २०२३ महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन यशस्वीरित्या पार पडले.

३० मे २०२३ मुंबई Youth for Mumbai Speakers Forum 2022 (Initiative of Mumbai Police) आयोजित 'Mumbai Vision 2023' या वक्तृत्व स्पर्धेत श्रीमती वरुणा पाटील, श्रीमती अलफिया खान, श्रीमती ऋतुजा भोईर या B.Ed. च्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यात सहभागी झाल्याबद्दल पोलीस उपायुक्त परिमंडळ ०७ मुंबई यांच्यातर्फे विशेष प्रमाणपत्र देण्यात आले.